सहकारी कर्ज वसुलीचे धोरण.

महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्र. सीसीआर- १४९५/प्र.क्र.५३५/२ सी
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक १४ सप्टेंबर, १९९५

शासन निर्णय:-

अल्प व दिर्घ मुदत कर्जाची वसुली करण्याबाबतचे धोरण शासन निर्णय क्रमांक- सीसीआर-११८६/सीआर-६५४/२ सी, दिनांक २९ जानेवारी, १९८७ अन्वये जाहीर केलेले आहे.

राज्यात शेतक-यांनी सहकारी बँकाकडून घेतलेल्या कर्जाची वसुली सक्तीने केली जात आहे असे शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. राज्यातील टंचाई परिस्थिती लक्षात घेता उपरोक्त शासन निर्णय पुन्हा सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. शासन निर्णय क्र. सीसीआर-११८६/प्र.क्र.६५४/२ सी, दिनांक २९ जानेवारी, १९८७ ची प्रत सोबत जोडली आहे. तरी या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी ही विनंती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ दि. मा. दहाते ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

सोबत : २९ जानेवारी, १९८७
शासन निर्णयाची प्रत.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी,

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटींग फेडरेशन , मुंबई- ४०० ०[illegible]९

कार्यकारीसंचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक [म.] मुंबई- ४०० ०२३

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि व ग्रामीण विकास बँक [म.]मु. ४०० ००[illegible]

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कॉटन ग्रोअर्स को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग

फेडरेशन, मुंबई-४०० ०१५.

व्यवस्थापक, सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

व्यवस्थापक सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या

व्यवस्थापक, सर्व सहकारी साखर कारखाने

कार्यकारी संचालक, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक, पूनम चेंबर्स,

वरळी, मुंबई- ४०० ०१८.

व्यवस्थापक, विभागीय कार्यालय सेल, राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक,

गारमेंट हाऊस, वरळी, मुंबई- ४०० ०१८.

मुख्य सचिव,

मुख्यमंत्र्यांचे सचिव,

## सहकारी कर्ज वसुलीचे धोरण.

महाराष्ट्र शासन,
कृषि व सहकार विभाग,
शासन निर्णय क्र. सीसीआर-११८६/सीआर-६५४/२-सी.
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २९ जानेवारी १९८७.

शासन निर्णय:- राज्यातील पर्जन्यमान व पिक परिस्थिती यांचा आढावा घेऊन सहकारी कर्ज वसुलीबाबतचे शासनाचे धोरण दरवर्षी जाहीर करण्यांत येत आहे. दरवर्षी, नवे धोरण जाहीर करण्यामुळे कर्जदार शेतकऱ्यांमध्ये तसेच सहकारी कर्ज वसुली यंत्रणेमध्ये अनिश्चिततेचे वातावरण रहाते. सहकारी कर्ज वसुलीसाठी कायम स्वरुपाचे धोरण असावे. याबाबत राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक [नाबार्ड] व संबंधित सहकारी बँका यांनी शासनाकडे वेळोवेळी आग्रह धरला आहे. याबाबत संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेऊन येणेप्रमाणे आदेश देण्यात येतात.

२. सहकारी कर्ज वसुलीबाबत शासनाने यापूर्वी दिलेले सर्व आदेश, परिपत्रके इत्यादी रद्द करुन सहकारी कर्ज वसुलीबाबतचे कायम स्वरुपी धोरण जाहीर करण्यात येत आहे.

३. सहकारी कर्जाची वसुली करणे ही प्रामुख्याने, पतपुरवठा करणाऱ्या संबंधित सहकारी संस्थांची जबाबदारी आहे. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी संबंधित सहकारी पतपुरवठा यंत्रणेच्या सल्ल्याने, सहकारी कर्जाच्या वसूलीचे लक्ष्य ( Target)दरवर्षी ठरवावेत. सहकार विभागाच्या कर्ज वसूली यंत्रणेने संबंधित सहकारी बँकांच्या कर्ज वसूली यंत्रणेस वेळोवेळी मार्गदर्शन करुन लक्ष्यपूर्ती गाठण्यासाठी जारीने प्रयत्न करावेत. त्यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी वेळोवेळी सविस्तर मार्गदर्शनात्मक सूचना संबंधित बँकांना व त्यांच्याकडील कर्ज वसूली यंत्रणेला द्याव्यात.

४. ज्या ठिकाणी टंचाईची परिस्थिती जाहीर केलेली नाही व पैसेवारी ५० पैशापेक्षा जास्त [८७ कायम दुष्काळी तालुक्यात ६० पैशापेक्षा जास्त] जाहीर करण्यात आलेली आहे अशा ठिकाणी राजीखुषीने तद्वतच सक्तीच्या मार्गाने सहकारी कर्जाची वसूली करण्यास सहकारी कर्जवसुली यंत्रणेस मुभा राहील.

५. ज्या ठिकाणी पैसेवारी ५० पैसे अगर त्यापेक्षा कमी [८७ कायम दुष्काळी तालुक्यात ६० पैसे अगर त्यापेक्षा कमी] जाहीर झाली असेल त्या ठिकाणी फक्त राजीखुषीनेच सहकारी कर्जाची वसुली करण्यात यावी. मात्र पुढे दिलेल्या ६ अपवादात्मक प्रकरणांमध्ये कर्ज वसुलीसाठी सक्तीची कारवाई करण्यास हरकत नाही. ही अपवादात्मक प्रकरणे पुढीलप्रमाणे :

अ] ज्यांनी सहकारी पतयंत्रणेमार्फत कर्ज घेऊन कर्जाचा गैरवापर केला असेल व कर्ज थकविले असेल असे सर्व थकबाकीदार.

ब] ज्यांनी सहकारी पतयंत्रणेमार्फत कर्ज घेताना तारण दिलेली जमीन अगर मालमत्ता संबंधित संस्थेस न कळविता, विकली असेल, मात्र घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नसेल असे सर्व थकबाकीदार.

क] ज्यांना पारंपारिक व खात्रीचा पाणीपुरवठा उपलब्ध असून त्या पाण्यावर भाजीपाला, द्राक्षे, संत्री, केळी, ऊस, कापूस इत्यादीसारखी नगदी पिके [Cash Crops ] घेतलेली आहेत अशा बागायतदार शेतक-यांनी कर्ज घेऊन ते थकविले असेल असे सर्व थकबाकीदार.

ड] ज्यांच्याकडे रु.१०,०००/- पेक्षा जास्त दिर्घमुदत कर्ज किंवा रु.५,०००/- पेक्षा जास्त [कोकणातील ४ जिल्हे तसेच भंडारा, चंद्रपूर, व गडचिरोली जिल्हयांतील कापूस न पिकणा-या भागात रु.२,५००/- पेक्षा जास्त] अल्प/मध्यम मुदत कर्ज थकित आहे असे सर्व थाकबाकीदार,

इ] ज्या कर्जदारांकडील कर्ज पाच वर्षे अगर त्याहून जास्त काळापासून थकित आहे असे सर्व जुने थकबाकीदार [मग त्याचेकडील थकबाकीची रक्कम कितीही असली तरी त्याचेवर कर्ज वसूलीसाठी सक्तीची कारवाई करण्यास हरकत नाही.

उ] महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँकेची जी बध्दमूल थकबाकी [ BlockedOverdues] गोठविण्यात आली आहे. त्यापैकी कर्ज ज्याचेकडून येणे आहे असे सर्व थकबाकीदार.

६] राज्यातील टंचाईग्रस्त अगर बिगर टंचाईग्रस्त अशा कोणत्याही भागामध्ये पुढील ४ प्रकरणी सहकारी कर्ज वसूलीसाठी सक्तीची कारवाई करू नये, ही प्रकरणे पुढीलप्रमाणे-

अ] महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँकेकडून विहिरीसाठी कर्ज घेतलेले आहे परंतू भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने [ G.S.D.A. ] ती विहीर "अयशस्वी विहीर" म्हणून प्रमाणित केली आहे अशा विहिरीसाठी घेतलेले सर्व थकित असणारे सर्व थकबाकीदार.

ब] अवर्षाणामुळे ज्या विहिरी कोरडया पडल्या अगर ज्या विहिरीमधून पुरेसे पाणी उपलब्ध झाले नाही, त्यामुळे त्यावरील पिके वाळून गेली पिकाचे नुकसान झाले असे सर्व थकबाकीदार, मात्र असे प्रत्येक प्रकरण स्वतंत्रपणे तपासावे व गुणवत्तेच्या निकषांवर प्रत्येक प्रकरणी योग्य तो निर्णय घेतला पाहिजे.

क] ज्या जमिनीच्या तारणावर सहकारी पत यंत्रणेमार्फत कर्ज घेतले आहे व अशी जमीन शासनाने संपादित केली असून जमिनधारक शेतक-यास नुकसानभरपाई पूर्णपणे अथवा बहुतांशी मिळालेली नाही अशा कर्जदार शेतक-यांकडील त्या जमीनीवरील.

कर्जाची थकबाकी मात्र अशा सर्व प्रकरणांची मागाहोती, संबंधित सहकारी संस्थेने/बँकेने परस्पर संबंधित भूसंपादन अधिकाऱ्यास, विनाविलंब देऊन संबंधित कर्जदार शेतकऱ्यास मिळणाऱ्या/देय असलेल्या नुकसान भरपाईच्या रकमेतून, कर्जाची/थकबाकीची रक्कम वसूल करून घ्यावी, सहकार विभागाच्या व संबंधित बँकांच्या वसूली यंत्रणेने याबाबत लक्ष घालून पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

ड] महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँककडून विद्युत मोटार अथवा पंपसेटसाठी कर्ज घेतले असून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून [M.S.E.B. ] ज्यांना अद्यापही विजपुरवठा झालेला नाही अशा शेतकऱ्यांकडील विद्युत मोटार व पंपसेटसाठी घेतलेले कर्ज थकित झाले असल्यास ते थकबाकीदार,

७. सक्तीची कारवाई करून कर्जवसुली करीत असता, कोणत्याही परिस्थितीत व राज्याच्या कोणत्याही [टंचाईग्रस्त अगर बिगर टंचाईग्रस्त] क्षेत्रात सिव्हील प्रोसिजर कोड अंतर्गत मज्जाव असलेल्या कोणत्याही वस्तुची जप्ती व लिलाव करू नये. याबाबत निबंधकांनी सर्व संबंधितांना सक्त सुचना देऊन त्याचे पालन होईल असे पहावे. अशा वस्तु पुढीलप्रमाणे:-

अ] स्वयंपाकाची व दैनंदिन वापराची भांडीकुंडी अत्यावश्यक/कृषि साहित्ये व वस्त्रे इत्यादी.

ब] राहत्या घरांवरील पत्रे, कौले, इत्यादी,

क] स्वतःच्या व कुटुंबीयांच्या वर्षभराच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक असलेले व त्यासाठी ठेवलेले अन्नधान्य.

ड] बैल, यासारखी शेतीची जनावरे व नांगर इ. औजारे,

ई] ऑईल इंजन, विद्युत मोटर, पंपसेट इत्यादी सारखी पाणीपुरवठ्याची चालू वापरातील यंत्रे

८. टंचाईच्या परिस्थितीच्या संदर्भातील स्थायी आदेशानुसार पात्र शेतकऱ्यांना, त्यांच्याकडील चालू पिककर्जाची मध्यम मुदत कर्जात रुपांतर करणे, मध्यम मुदत कर्जाच्या चालू हप्त्याचे फेर रुपांतर व फेर रुपांतरीत हप्त्याची फेर आखणी करणे, महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बँकेच्या दीर्घमुदत कर्जाच्या चालू हप्त्याची वसुली एक वर्षाने पुढे ढकलणे इत्यादी फायदे नियमानुसार देण्यात यावेत. हे फायदे सर्व पात्र शेतकऱ्यांना मिळवून देण्याची जबाबदारी संबंधित सहकारी संस्था/बँका तसेच सहकार विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर राहील.

९. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अधिनियम ४८-अ आणि कृषि उत्पन्न बाजार समिती [नियमन] अधिनियमन १९६३ च्या अधिनियम ३०-अ अन्वये शेतीमालाच्या विक्रीतून सांगडपध्दतीने [ Linking) ] करण्यात येणारी सहकारी कर्जाची वसूली, सर्वत्र [टंचाईग्रस्त व बिगर टंचाईग्रस्त भागात] नियमानुसार करण्यात यावी. यामध्ये राज्याच्या कोणत्याही क्षेत्रात व कोणत्याही परिस्थितीत हस्तक्षेप करता येणार नाही. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी सहकारी बँकांच्या व सहकार विभागाच्या कर्जवसुली यंत्रणेत याबाबत आवश्यक त्या स्पष्ट सूचना द्याव्यात.

१०. सहकार विभागाच्या तसेच संबंधित सहकारी बँकांच्या कर्जवसुलीचे अधिकार दिलेल्या सर्व संबंधितांनी वरील सुचनांचे कोटेकोरपणे पालन करुन जास्तीत जास्त कर्जवसुली करण्याचे कसोशिने प्रयत्न करावेत. तद्वतच कोणत्याही परिस्थितीत वरील सुचनांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

११. सहकारी कर्जवसुलीबाबतचे सदर आदेश शासनाच्या पुढील आदेशापर्यन्त कायम राहातील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

[भा. ध. पंवार]
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
कृषि व सहकार विभाग.

९५

२०



कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅन्क [म], मुंबई-४०० ०३२.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी भूविकास बॅन्क [म], मुंबई-७.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कॉटन ग्रोअर्स को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन, मुंबई-१५.

व्यवस्थापक, सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्का.

व्यवस्थापक, सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या.

व्यवस्थापक, सर्व सहकारी साखर कारखाने.

कार्यकारी संचालक, राष्ट्रीय कृषि व ग्रामिण विकास बॅन्क, पुनम चेंबर्स, वरळी, मुंबई-४०० ०१८.

व्यवस्थापक, विभागीय कार्यालय सेल, राष्ट्रीय कृषि व ग्रामिण विकास बॅन्क, गारमेंट हाऊस, वरळी, मुंबई-४०० ०१८.

मुख्य सचिव,